MHAH160004602022

<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक १४९/२०२२ मधील निशाणी ५ खालील आदेश</u>

१. अर्जदाराने प्रस्तुत मुळ अर्ज गैरअर्जदाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलाचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज नि. ५ हा अर्जदाराने तिला अंतरिम पोटगी मिळावी याकरिता न्यायप्रविष्ठ केला असून अर्जाकामी गैरअर्जदाराचे म्हणणे मागविले. गैरअर्जदार यांनी अर्ज नि. ५ ला त्यांचे म्हणणे नि. १२ कडे दाखल केलेले आहे. अर्जदाराकडून श्रीमती अे.पी.डेरे आणि गैरअर्जदाराकडून श्री.अमोल चौबल यांचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्ज अंतरिम पोटगीकरिताचा आहे. प्रस्तुत अर्ज निकाली काढण्याकरिता अर्ज आणि अर्जावरील म्हणणे पाहता खालील प्रश्न उपस्थित होतात. सदर प्रश्न आणि त्यांवरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही गैरअर्जदाराकडून मागणीप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय असल्यास किती ? | अशंत होय.<br>अर्जदार गैरअर्जदाराकडून दरमहा रक्कम रुपये ७,०००/- पोटगी मिळण्यास पात्र आहे. |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार मागणीप्रमाणे संरक्षण अधिकारी यांची नेमणुक होवून मिळण्यास पात्र आहे काय ? | नाही. |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

प्रश्न क्रमांक १ करिता.

३. अर्जदाराने प्रस्तुत मुळ अर्ज गैरअर्जदाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलाचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदाराचा आणि गैरअर्जदाराचा विवाह झाला असून ते सेंट्रल एक्साईज आणि कस्टम खात्यामध्ये पोलीस अधिक्षक म्हणून कार्यरत होत आणि ते आता सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांस दरमहा रक्कम रुपये चाळीस हजार निवृत्तीवेतन मिळते. गैरअर्जदार हे बायपोलर डिसआर्डर या मानसिक विकाराने ग्रस्त होते त्यामुळे अर्जदाराला नांदण्याकरिता त्रास झाला. तरीही सर्व सहन करुन अर्जदार ही गैरअर्जदारासमवेत नांदत होती. अर्जदाराला आणि गैरअर्जदारांना विवाहसंबधातुन अपत्यप्राप्ती झाली नाही म्हणून गैरअर्जदार हा वेळोवेळी अर्जदाराला त्रास देत असे. गैरअर्जदार हा अर्जदाराचे माहेरील लोकांना बोल लावत असे. गैरअर्जदाराचा स्वभाव बाहेरख्याली असून त्याचे विविध महिलांसोबत तसेच बारबालांसमवेत शाररीक संबध आहेत. जुलै २०२१ मध्ये गैरअर्जदाराला मंजु पटेल नामक बारबालाचा फोन आला आणि त्यांचे संभाषण ऐकुण अर्जदाराने तिचा विरोध नोंदविला असता गैरअर्जदाराने अर्जदाराला मारहाण केली आणि घराबाहेर काढुन दिले. त्यानंतर अर्जदार पुन्हा नांदण्यास गेली असता तिला समजले की, गैरअर्जदाराने अर्जदाराचे सर्व सामान कोणालातरी देवू

केले आहे. उभय पक्षांनी वाद मिटविण्याकरिता बैठक घेतली परंतु त्यांतुन फलश्रुती झाली नाही. आता अर्जदार ही माहेरी राहत आहे. यादरम्यान गैरअर्जदार यांनी अर्जदाराला कोणतीही अन्नवस्त्राची रक्कम दिलेली नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराचा त्याग केला आहे. अर्जदार स्वतःचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे. तिला वयोमानाने कोणताही कामधंदा होत नाही. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदाराला दरमहा रुपये चाळीस हजार निवृत्तीवेतन मिळते त्याची मौजे पोपेरेवाडी, ता.अकोले येथे पाच एकर शेतजमीन आहे त्यामध्ये असलेल्या तांदुळ, खुरासणी, वरई पिकांपासुन त्यास दरसाल चार ते पाच लाख रुपये उत्पन्न मिळते. त्याची स्वतःच्या मालकीची कल्याण येथे दोन बी.एच.के. सदनिका आहे. तो आर्थिकदृष्टया संपन्न् असून अर्जदाराला पोटगी देण्यास सक्षम आहे. अर्जाचा निकाल होण्यास अदयाप अवधी आहे. दरम्यान अर्जदाराची उपासमार होत आहे. सबब गैरअर्जदाराकडून अर्जाचा निकाल होईपावेतो दरमहा रक्कम रुपये १५,०००/- अंतरिम पोटगी मिळावी.

४. गैरअर्जदार यांनी नि. १२ कडे अर्जदाराचे अर्जास म्हणणे देत अर्जातील नातेसंबधाव्यतिरीक्त इतर सर्व मजकुर नाकारला आहे. त्यांचे असे कथन आहे की, ते सेंट्रल एक्साईज आणि कस्टम खात्यामध्ये पोलीस अधिक्षक नाही तर निरीक्षक म्हणून नोकरीला होते. ते आता सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांस दरमहा रुपये ४०,०००/- निवृत्तीवेतन मिळते ही बाब जरी खरी असली तरीही ते बायपोलर डिसऑर्डर या मानसिक आजाराने तसेच वयोमानाने इतर तक्रारींशी म्हणजेच उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यांदी आजारांनी ग्रसित आहेत. या आजाराबाबत

त्यांनी अर्जदाराला विवाहपुर्वी कल्पना दिलेली आहे. अलिकडे दोन महिन्यांपुर्वी त्यांच्या अन्ननलिकेध्ये दोन गाठी आढळुन आल्या आहेत आणि डॉक्टरांच्या मते त्या कर्करोगाच्या असण्याची दाट शक्यता आहे. सदर उपचाराकामी त्यांचा रक्कम रुपये ५०,०००/- खर्च झाला आहे. अर्जदार ही डबे करुन दरमहा रक्कम रुपये २५,०००/- ते ३०,०००/- कमावते तीला पोटगीची कोणतीही आवश्यकता नाही. गैरअर्जदाराची अर्जदाराला पोटगी देण्याची ऐपत नाही कारण त्यांचा बहुतांशी उत्पन्न हे औषधोपचाराकरिता खर्च होत आहे. अर्जदार कथन करते त्याप्रमाणे त्यांस शेतीपासुन उत्पन्न नाही. सबब अर्जदारांचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती गैरअर्जदार यांनी केली आहे.

५. अर्ज आणि प्रकरणाचा अभिलेख पाहता उभयंतामधील नातेसंबध हे वादातीत नाहत. अर्जदाराने तिच्या कथनापुष्ठयर्थ नि. ८ कडे तर गैरअर्जदार यांनी नि. १३ कडे त्यांच्या उत्पन्न आणि खर्चाबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. प्रस्तुत अर्ज नि. ५ चे स्वरुप पाहता तो अंतरिम पोटगीकरिता आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे नि. १२ आणि प्रतिज्ञापत्र नि. १३ पाहता ते सेंट्रल एक्साईज आणि कस्टम खात्यामध्ये निरीक्षक पदी कार्यरत होते आणि ते आता सेवानिवृत्त झाले आहेत ही बाब त्यांनी शपथेवर कथन केलेली आहे तसेच त्यांना दरमहा रुपये चाळीस हजार निवृत्तीवेतन मिळते. त्यांचे नावे सदनिका तसेच इतर स्थावर मालमत्ता आहे ही बाब देखील मान्य करण्यात आली आहे. त्यांची राष्ट्रीय बचत पत्रामध्ये चार लाख पंचवीस हजार तसेच भविष्य निर्वाह निधीमध्ये रक्कम रुपये १०,६६,७९७/- आहे ही बाब देखील मान्य आहे. सबब गैरअर्जदार हे आर्थिकदृष्टया संपन्न् आहेत ही बाब

अधोरेखीत होत आहे. आता राहिली बाब अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी आहे आणि ती सदयस्थितीत तिच्या माहेरी आश्रीत म्हणून राहत आहे ही बाब देखील गैरअर्जदाराने मान्य केलेली आहे. उभयंताचे विवाहसंबध अदयापही कायम आहेत. अशा परिस्थीत गैरअर्जदाराने अर्जदाराची त्याची पत्नी या नात्याने अन्नवस्त्राची तरतुद करणे आवश्यक आहे. अर्जदार ही स्वतःचा चरितार्थ चालवू शकते आणि तिला उत्पन्न आहे ही बाब योग्य त्या संपरिक्षेअंती सिध्द करावी लागणार आहे. तुर्तास प्रस्तुत अर्ज हा अंतरिम पोटगीकरिता आहे आणि या स्थितीला गैरअर्जदार याने अर्जदाराकरिता कोणतीही तरतुद केली असे म्हणणे नाही. सबब या बाबीचा विचार करुन अर्जाचा निकाल होईपावेतो अर्जदाराला अंतरिम पोटगी देणे आवश्यक आहे. गैरअर्जदाराच्या उत्पन्नाचा तसेच जबाबदा-यांचा विचार करता तसेच त्याच्याकडे असणारी अचल संपत्ती तसेच त्याचा राहणीमानाचा दर्जा पाहता अर्जदार ही गैरअर्जदाराकडून दरमहा रुपये पंधरा हजार पोटगी मिळविण्यास पात्र नाही परंतु अर्जदार गैरअर्जदाराकडून दरमहा रुपये ७,०००/- अंतरिम पोटगी देणे रास्त व उचित ठरेल. सबब मी प्रश्न क्रमांक १ चे उत्तर अशंतः होकारार्थी देत आहे.

<u>प्रश्न क्रमांक २ करिता.</u>

६. अर्जदाराने तिच्याकरिता संरक्षण अधिकारी यांची नियुक्ती होवून तिला सरंक्षण मिळावे अशी विनंती केली आहे. सदयस्थितीत अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे ही बाब वादातीत नाही तसेच गैरअर्जदार हा कल्याण येथे राहत आहे ही बाब देखील अधोरेखांकित झाली आहे. गैरअर्जदार हा ज्येष्ठ नागरिक आहे.

आणि त्याने अर्जदारावर माहेरी येवून हिंसाचार केला असे अर्जदाराचे कथन नाही. सबब अर्जदार ही मागणीप्रमाणे संरक्षण अधिकारी यांची नियुक्ती होण्यास आणि सरंक्षण आदेश मिळण्यास पात्र नाही ही बाब दिसुन येते. सबब मी प्रश्न क्रमांक २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

प्रश्न क्रमांक ३ करिता.

७. प्रश्न क्रमांक १ व २ ची कारण मिमांसा आणि त्यांची आलेले निष्कर्ष पाहता, अर्जदार ही गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. सबब अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी मुळ अर्जाचा निकाल होईपावेतो अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ७,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात हजार मात्र ) प्रस्तुत अर्जाचे दाखल तारखेपासुन दयावेत.

३. अर्जाचा खर्च मुळ अर्जाच्या निकालावेळी गुणदोषावर ठरविण्यात येईल.

४. या आदेशाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत करुन घोषीत केला.

SHWETA ABHIJIT PARWATKAR

Digitally signed by SHWETA ABHIJIT PARWATKAR
Date: 2023.03.24 13:24:10 +0530

दिनांक २४.०३.२०२३
अकोले

(श्रीमती एस.अे. पर्वतकर )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अकोले.